## रे.मु.नं. १७५/२०१० मधील निशाण क्र.१४५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र.१३ अनिल शंकर पवार यांचे बाबत पारीत झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जात वादीचे कथन असे की, यातील प्रतिवादी क्र.१३ अनिल शंकर पवार हे दि.०६.१०.२०१८ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यू नंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेबाबतची तसेच त्यांचे मृत्यूबाबतची माहिती वादी यांचेकडून अनावधानाने व अज्ञानपणामुळे वकीलांना देणेचे राहून गेलेमुळे प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस कायद्याच्या मुदतीत अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र.१३ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर न घेतलेमुळे प्रतिवादी क्र.१३ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. सबब, सदर प्रतिवादी विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होवून प्रतिवादी क्र.१३ चे वारस रेकॉर्डवर घेणेस वादीस परवानगी मिळणेकामी न्यायाचे व गरजेचे झालेले आहे. प्रतिवादी क्र.१३ यांचे विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द झालेस प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रतिवादी क्र.१३ विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द करण्यात यावा तसेच सदर प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

०३. सदर अर्जास प्रतिवादी क्र.३ याने म्हणणे देवून असे कथन केले की, अर्ज खरा व कायदेशीर नाही. अर्जात योग्य कारण दिलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१३ हे दि.०६.१०.२०१८ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे त्यांचे वारस दाव्याच्या कामी सामील करणे आवश्यक आहे. वादीने सदर प्रतिवादी क्र.१३ च्या मृत्यूची माहिती अनावधानामुळे व अज्ञानमुळे त्यांच्या वकीलांना देण्याचे राहून गेल्यामुळे सदर मयत प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस रेकॉर्डवर मुदतीत घेता

आले नाहीत, असे कारण आपल्या अर्जात नमूद केले आहे. सदर कथनाच्या पुष्ठ्यर्थ वादीने नि.क्र.१४६ वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द डिक्लेरेशन,वाटप व पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषावर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रतिवादी क्र.१३ यांचेबाबत झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. तसेच अशा परिस्थितीत दाव्याचा संपूर्णपणे व कायम स्वरुपी न्यायनिर्णिय होणेकामी प्रतिवादी क्र.१३ च्या वारसांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रतिवादी क्र.१३ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. ही बाब निश्चितपणे जाणवते की, प्रतिवादीस विनाकारण विलंब आणि मानसिक त्रास सहन करावा लागला, त्यामुळे सदरची बाब ही वादीवर आर्थिक भुर्दंड लावून काही अंशी कमी करता येवू शकते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाण क्र.१४३ वरील आदेशात नमुद रक्कम वादीने प्रतिवादीस देणेचे अटीवर सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१३ बाबत झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो, तसेच प्रतिवादी क्र.१३ च्या वारसांना अभिलेखावर घेणेस परवानगी देण्यात येते.

दिनांक – १२/१२/२०२४.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2024.12.13 11:05:33 +0530

(एस.एस. साळुंखे)
३रे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.